# दरपत्रक मागणी

शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प. सोलापूर यांचे मार्फत शिक्षक दिन आदर्श शिक्षक पुरस्कार आदर्श शाळा, गुणवंत विद्यार्थी पुरस्कार या योजने अंतर्गत जिल्हास्तरुन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १५ ते २० जानेवारी २०२० दरम्यान हुतात्मा स्मृती मंदीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सोलापूर येथे करणेसाठी खालील बाबींचे दरपत्रक मागविण्यात येत आहेत. (कार्यक्रमाचे ठीकाण व दिनांक मध्ये बदल होवू शकतो)

१) **छपाई:-** १) प्रमाणपत्र (A४ साईज Four colour व Two colour) २) कार्यक्रम पत्रीका (A४ साईज Four ४) निमंत्रण पत्रिका (६x८ साईज) पाकिटा सह

२) **सन्मान चिन्ह:-** लाकडी ८, १०, १२ व १४ इंच आकारामध्ये प्रत्येकी एक नगाचे वेगळे दर नमुद करावेत. तसेच काचेच्या बॉक्स मध्ये लाकडी शिल्ड आकार ( १४इंच ) (एका नगाचे दर नमुद करावेत)

३) **शाल:-** १) VIP सत्कार शाल २) मेडीयम शाल ३) सत्कार फेटा(प्रत्येकी एक शाल व फेटा चे दर नमुद करावेत)

४) **भोजन व्यवस्था :-** कार्यक्रमाचे ठिकाणी भोजन तयार करुन केटरींन व्दारे वाटपास स्वतंत्र दर नमुद करावेत. (भोजन मेनू- पोटभर जेवण- चपाती, दोन स्विट पदार्थ, एक सुक्की व एक पात्तळ भाजी, भात, कोशींबीर इत्यादी)

वरील बाबींचे दरपत्रक दिनांक १३ /०१/२०२० पर्यंत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. सोलापूर यांचे नावे व पत्यावर बंद लखोट्यात सायंकाळी ३ .०० वाजे पर्यंत देण्यात यावेत.

**अटी व शर्ती**

१) PAN card आवश्यक आहे.

२) वैध शॉप ॲक्ट / आधार नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३) साहित्य पुरवटयामध्ये कोणताही प्रकारचा खंड पडला तरी निर्धारीत वेळेत साहित्य पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. तसेच अर्धवट झालेल्या पुरवठ्याचे देयके आदा केली जाणार नाही व एखादया वेळी काही कारणास्तव देयक अदा करण्यास उशीर झाल्यास त्यावरील व्याज दिले जाणार नाही.

४) लेखा परिक्षणात कोणत्याही प्रकारची रक्कमेची वसूली निघाल्यास ती या कार्यालयाने कळविल्यानंतर एक महिन्याच्या आत आपणास शिक्षण विभाग (प्राथमिक) या कार्यालयात जमा करावी लागेल.

५) सदर बाबत कोणताही वाद उद्भवल्यास त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल. न्यायालयीन प्रक्रिये बाबत कोणताही दावा उद्भवल्यास तो सोलापूर येथील न्यायालयातच सोडविला जाईल. (वरील साहित्याचे दर हे सर्व करासह दरपत्रकात नमुद करावेत)

६) साहित्य पुरवठ्या संबंधी अंतीम निर्णय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. सोलापूर यांचा राहील.

- निविदा धारकांना प्राधिका-यांनी वेळोवेळी निर्गत केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील
- दर पत्रक लखोटा दिनांक१३ /०१/२०२० रोजी सायंकाळी ०४ .०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीच्या दिवशी उघडणेत येणार असुन सदर वेळी निविदा धारकांनी उपस्थित रहावे.
- खरेदी प्राधिका-याबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्या बाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबबात निविदाधारकांची हमीपत्र सोबत बंध लखोट्यात देणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर